रासनिप्रा

कार्यालय, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, लातूर.
{Phone : 02382-255135; E-mail : djr.ltr@rediffmail.com}

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

जा. क्र. अर्थ-३/नांजिमस बँक निवडणूक/आक्षेप ५ व १०० : शिभा पवार/ ११७० /२६ दिनांक :- २५ मे, २०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ चे नियम ११ अन्वये आदेश**

**आक्षेपकर्त्याचे नाव :- श्री. शिवराज भाऊराव पवार, रा. होटाळा, ता. नायगाव, जि. नांदेड.**

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी दि. ४ मे, २०२६ ते दि. १३ मे, २०२६ या कालावधीत प्रारूप मतदार यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने आक्षेपनिहाय सादर केलेल्या संचिकेचे अवलोकन केले असता श्री. शिवराज भाऊराव पवार रा. होटाळा, ता. नायगाव, जि. नांदेड यांनी दि. ५ मे, २०२६ रोजी घेतलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने (आक्षेप अर्ज क्र. ५) सेवा सहकारी संस्था म., होटाळा, ता. नायगाव यांनी दि. १२.५.२०२६ चे पत्रान्वये (आक्षेप अर्ज क्र. १००) संस्थेचे अभिप्राय सादर केलेले आहेत. त्यामुळे सदर दोन्ही प्रकरणे (आक्षेप) एकच असल्याने सदर प्रकरणाची एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

आक्षेपकर्ते यांच्या म्हणण्यानुसार नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड या संस्थेच्या निवडणुकीची प्रारूप मतदार यादी दि. ४.५.२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदर यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ते सेवा सहकारी संस्था म., होटाळा, ता. नायगाव या संस्थेचे संचालक होते. त्यांनी त्यांच्या संचालक पदाचा राजीनामा दि. १०.३.२०२६ रोजी दिला होता, जो संस्थेच्या दि. २०.३.२०२६ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये मंजूर करण्यात आला. या प्रक्रियेची माहिती दि. ३०.३.२०२६ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था, नायगाव यांना लेखी पत्राद्वारे कळविण्यात आली आहे. बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवार, मतदार, सूचक, अनुमोदक होण्यासाठी प्रतिनिधीस अधिकार देणेबाबत मागविण्यात आलेल्या ठरावानुसार संस्थेच्या दि. ६.४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये आक्षेपकर्ते श्री. शिवराज भाऊराव पवार यांची नियुक्ती प्रतिनिधी म्हणून करण्यात आलेली आहे, दि. २७.३.२०२६ रोजीच्या सभेच्या सूचनेवर केवळ उर्वरीत १२ संचालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत, ज्यामध्ये आक्षेपकर्ता यांचे नाव संचालक म्हणून समाविष्ट नाही. यावरून हे स्पष्ट होते की, संबंधित सभेच्या वेळी ते संचालक पदावर नव्हते. आक्षेपकर्ता हा संस्थेचा रीतसर निवडलेला प्रतिनिधी असूनही दि. ४.५.२०२६ च्या प्रारूप मतदार यादीत नाव वगळण्यात आले आहे. तरी सोबत जोडलेल्या पुराव्यांच्या आधारे सदरचा आक्षेप मंजूर करावा आणि अंतिम मतदार यादीमध्ये आक्षेपकर्ता यांचे नाव समाविष्ट करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

संस्थेने सादर केलेल्या अभिप्रायामध्ये श्री. शिवराज भाऊराव पवार हे संस्थेचे संचालक होते. त्यांनी दि. १०/०३/२०२६ रोजी संस्थेच्या संचालक पदाचा राजीनामा दिला. सदर राजीनामा संस्थेने दि. २०/०३/२०२६ च्या संचालक मंडळाचे सभेमध्ये रीतसर मंजूर केला. नांदेड जि. म. सह. बँक लि. नांदेड या बँकेच्या



Scanned with OKEN Scanner